**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारताच्या उद्दिष्टासाठी अथक परिश्रम करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नागरी सेवेतल्या अधिकाऱ्यांना आवाहन, नागरी सेवा दिनानिमित्त नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव

- प्रशासकीय अधिकाऱ्यांना लोकाभिमुख होण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचा सल्ला

- शेअर बाजारात सलग पाचव्या सत्रात जोरदार तेजी, सोनं-चांदी १ लाखाच्या उंबरठ्यावर

**आणि**

- पोप फ्रांसिस यांचं व्हॅटिकन सिटीमध्ये निधन

**<><><><><><>**

सरकारच्या धोरणांचा दूरगामी परिणाम होणार असल्याने विकसित भारताच्या उद्दिष्टासाठी अथक परिश्रम करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरी सेवेतल्या अधिकाऱ्यांना केलं आहे. नागरी सेवा दिनानिमित्त आज दिल्लीत विज्ञान भवन इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. केवळ नशिबाच्या जोरावर, कष्ट न करता यश मिळत नसतं, बदलत्या काळाचा वेग लक्षात घेऊन तंत्रज्ञानाच्या आधारे विकासाच्या संधी निर्माण केल्या पाहिजेत असं ते म्हणाले. गेल्या १० वर्षात देशाने विविध विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून केलेल्या प्रगतीची उदाहरणं मोदी यांनी दिली.

**होल्ड - प्रधानमंत्री (२४ सेकंद)**

पीडित आणि वंचितांबद्दल सहानुभूतीचा दृष्टिकोन ठेवून सर्वांना सामावून घेणारा विकास घडवावा असा सल्ला त्यांनी नागरी सेवा अधिकाऱ्यांना दिला.

प्रशासनातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे प्रधानमंत्री उत्कृष्ट प्रशासन पुरस्कार यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १६ अधिकाऱ्यांना देण्यात आले. समग्र जिल्हा विकास, आकांक्षित खंड विकास कार्यक्रम आणि नवोन्मेष अशा तीन विभागात मिळून आलेल्या १५८८ प्रवेशिकांमधून हे १६ पुरस्कार देण्यात आले. स्मृतीचिन्ह, मानपत्र, आणि २० लाख रुपयांचं रोख पारितोषिक असं पुरस्कारांचं स्वरूप आहे.

समग्र जिल्हा विकास गटात २०२३ या वर्षाकरता नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. केंद्र सरकारच्या विविध १२ योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी हा पुरस्कार देण्यात आला. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंग, प्रधानमंत्र्याचे प्रधान सचिव शक्तिकांत दास आणि प्रशासकीय सेवेतले वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकाभिमुख असणं महत्वाचं आहे, लोकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणं हे प्रशासनाचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. नागरी सेवा दिवसानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते आज बोलत होते. प्रशासकीय सेवेत महाराष्ट्र देशात अग्रणी असून राज्यातली प्रशासकीय सेवा प्रगतीशील आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांमधे प्रचंड क्षमता आहे, राज्यात झालेल्या परिवर्तनाचं श्रेय अधिकाऱ्यांनाच जातं असं मुख्यमंत्री म्हणाले.

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री (२५ सेकंद)**

अनेक अधिकाऱ्यांसोबत काम करताना आपल्याला खूप शिकायला मिळालं, प्रशासक म्हणून आपला अनुभव समृद्ध झाला अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी काळानुसार तंत्रज्ञानाचा स्वीकार करणं गरजेचं आहे, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धेतल्या गुणवंत अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बक्षीस प्रदान करण्यात आलं.

**<><><><><>**

केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलवाहतूक मंत्री सर्बांनंद सोनोवाल यांनी मुंबईतल्या नव्या इंटरनॅशनल क्रुझ टर्मिनलवरुन वाहतूक सेवेला आज सुरुवात केली. दिवसाला १० हजार आणि वर्षाला १० लाख प्रवासी वाहतूक करण्याची या टर्मिनलची क्षमता आहे. देशातलं हे सर्वात मोठं जागतिक दर्जाचं क्रुझ टर्मिनल आहे. बंदरं आधारित संपन्नेचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. त्याचाच एक भाग म्हणून भारताला जगातलं आघाडीचं क्रुझ टर्मिनल करण्याचा उद्देश असल्याचं सोनोवाल म्हणाले.

मुंबई पोर्ट ट्रस्टमधल्या व्हिटोरिया डॉकमध्ये असलेल्या नुतनीकरण केलेल्या अग्निशमन स्मारकांचं उद्घाटनासह इतर काही प्रकल्पांचं लोकार्पण त्यांनी केलं.

**<><><><><>**

सर्वांनी आपल्या यकृताची काळजी घ्यावी, नियमित तपासणी करून घ्यावी तसंच निरोगी जीवनशैली अंगीकारावी, असं आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी केलं आहे. यकृत आरोग्य प्रतिज्ञा समारंभात ते आज नवी दिल्लीत बोलत होते. यकृत निरोगी नसेल, तर संपूर्ण शरीराला त्याचा त्रास भोगावा लागतो, यकृत निरोगी नसेल तर मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार तसंच कर्करोगाचाही धोका उद्भवू शकतो असं नड्डा म्हणाले. निरोगी जीवनशैली आणि आरोग्यदायी आहाराच्या मदतीने हा धोका टाळता येऊ शकतो असं नड्डा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

वारंवार निवडणुकांमध्ये पराभव झाल्यानं राहुल गांधी यांच्या मनावर परिणाम झालाय, त्यामुळे ते मतदान प्रक्रिया आणि मतदार यादीवर संशय निर्माण करत

आहेत, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

राहुल गांधी यांनी अमेरिका दौऱ्यात काल संध्याकाळी तिथल्या भारतीय समुदायाला संबोधित करताना, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत निवडणूक आयोगानं तडजोड केल्याचा, तसंच व्यवस्थेत मोठी त्रुटी असल्याचा आरोप केला. त्यावेळी त्यांनी या निवडणुकीतल्या मतदानाची विशिष्ट आकडेवारी दिली. त्यावर फडनवीस यांनी टीकास्त्र सोडलं.

<><><><><>

पश्चिम बंगालमधे मुर्शिदाबाद इथं निमलष्करी दल तैनात करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर कोणतेही आदेश द्यायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. मुर्शिदाबादमधे वक्फ कायद्यावरुन उसळलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर तिथं तातडीने कलम ३५५ लागू करून निमलष्करी दल तैनात करावं असा अर्ज न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन मसीह यांच्या पीठासमोर सुनावणीला आला होता. त्यावर, न्यायालय सरकारच्या कामकाजात हस्तक्षेप करत असल्याचा आरोप आधीच होत आहे, त्यात आपण भर घालू इच्छित नाही अशी टिप्पणी न्यायमूर्ती गवई यांनी केली. मुर्शिदाबाद दंगलींची चौकशी सर्वोच्च न्यायालयातून निवृत्त झालेल्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून करावी अशी मागणी याचिकेत केली आहे.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज सलग पाचव्या दिवशी तेजी दिसून आली. बँकिंग, आय टी, तेल आणि वायू क्षेत्रातले समभाग वधारल्यानं सेन्सेक्स ८५५ अंकांची वाढ होऊन  दिवसअखेर तो ७९ हजार चारशे नऊ अंकांवर बंद झाला. निफ्टीमध्ये २७४ अंकांची भर पडून दिवसअखेर तो २४ हजार १२६ अंकांवर स्थिरावला.

मुंबई शेअर बाजारातल्या सूचिबद्ध कंपन्यांच्या बाजार भांडवलानं ५ अब्ज अमेरिकन डॉलर्सचा टप्पा पार केल्यानं बाजारात तेजीचं वातावरण पुन्हा पसरलं, असं विश्लेषकांनी सांगितलं. या आधी २० जानेवारीला बाजार भांडवल ५ अब्ज डॉलरच्या पातळीवर पोहोचलं होतं, मात्र २८ फेब्रुवारीला आलेल्या मंदीनं भांडवलात मोठी घसरण झाली होती.

सोन्या - चांदीचे दर आज १ लाखाच्या उंबरठ्यावर पोहोचले. मुंबईच्या बाजारपेठेत २४ कॅरेट सोनं तोळ्या मागे साडे सतराशे रुपयांनी महाग होऊन ९९ हजार ५७० रुपयांवर पोहोचलं. २२ कॅरेट सोनं ९७ हजार १८० रुपयांना एक तोळा मिळत होतं. तर एक किलो चांदीसाठी ९९ हजारांहून अधिक रुपये मोजावे लागत होते.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवसांच्या सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर जाणार असून उद्या ते जेद्दाह इथं पोहोचतील. गेल्या ४० वर्षांमध्ये जेद्दाह या सौदी अरेबियातल्या आर्थिक महत्त्वाच्या शहराला भारताचे प्रधानमंत्री प्रथमच भेट देणार आहेत. प्रादेशिक सुरक्षा, मानवतेच्या दृष्टिकोनातून परस्पर सहकार्य आणि संकटांना तोंड देण्यासाठीच्या धोरणांवर या दौऱ्यात द्विपक्षीय चर्चा होण्याची शक्यता आहे.

**<><><><><><>**

कॅथलिक ख्रिस्ती पंथाचे मुख्य धर्मगुरु पोप फ्रांसिस यांचं आज व्हॅटिकन सिटीत निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. गेले काही आठवडे ते गंभीर रीत्या आजारी होते. १२ वर्षांच्या कार्यकाळात पोप फ्रान्सिस यांनी कॅथलिक चर्चला नवीन रूप दिलं. गरीबांचे कैवारी म्हणून ते ओळखले जात.

पोप फ्रान्सिस यांच्या कार्यकाळाचा संक्षिप्त आढावा घेणारा वृत्तांत आता ऐकूया!

**होल्ड - औरंगाबाद व्हाइस कास्ट**

*पोप फ्रान्सिस यांच्या निधनाबद्दल जगभरातल्या नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. पोप फ्रान्सिस करुणा, विनम्रता आणि आध्यात्मिक धैर्याचा दीपस्तंभ म्हणून जगभरातल्या लाखो लोकांच्या स्मरणात राहतील , अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. पोप यांच्यासोबत झालेल्या भेटीच्या आठवणी त्यांनी जागवल्या.*

*कमनशिबी लोकांची सेवा करण्याची पोप फ्रान्सिस यांची तळमळ जगाला नेहमीच प्रेरणा देत राहील, असं युरोपियन आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी म्हटलं आहे. सर्वांना सामावून घेणाऱ्या जगाचं समर्थन आपल्या सततच्या प्रयत्नांमधून पोप करत असत, अशा शब्दांत ब्रिटिश प्रधानमंत्री कीर स्टारमर यांनी आपल्या शोकभावना मांडल्या.*

**<><><><><><>**

अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नवी दिल्लीत बैठक सुरू आहे.

**//<><><><><><>//**